*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

***NAVJYOT / Vol. XII / Issue - II*** ***ISSN 2277- 8063***

# तात्यासाहेब कोरे यांचे वारणा खोऱ्यातील सहकार चळवळीला लाभलेले योगदान

**सौरभ राजेश झेंडे,** एम.ए. सेट (इतिहास), संशोधक विद्यार्थी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

---

**प्रस्तावना :-**

सहकार ही एक अशी सामाजिक संस्था आहे की जिच्यामध्ये धर्म, वर्ग, जाती पंथ तसेच आर्थिक दृष्ट्या दुर्बल, शोषित अशा सर्व वर्गातील व्यक्तींना समता व समानतेच्या धाग्याने एकत्र बांधता येते. यातूनच संघर्ष विरहित समाजाची निर्मिती हे सहकार चे मूलभूत तत्त्वज्ञान बनले आहे. युरोपातील औद्योगिक क्रांतीनंतर सहकार कल्पनेकडे व्यापक दृष्टिकोनातून पाहिले जाऊ लागले. कामगारांना अधिक चांगले जीवन जगण्यासाठी खऱ्या अर्थाने सहकाराची सुरुवात इंग्लंडमध्ये इ.स. १८४४ मध्ये रॉबर्ट ओवोन या परोपकारी सदगृहस्थाने केली. म्हणून रॉबर्ट ओवोन हा सहकारी चळवळीचा जनक मानला जातो. इंग्लंड मधील रॉश्डेल टोंडसेन गल्लीतील २८ विणकारांनी जीवनावश्यक वस्तू स्वस्त किंमतीला उपलब्ध व्हाव्यात म्हणून इ. स. २१ डिसेंबर १८४४ मध्ये 'इक्विटेबल पायोनियर्स को. ऑपरेटिव्ह सोसायटीची' स्थापना केली. या संस्थेमुळे जगातील आधुनिक सहकार चळवळीची मुहूर्तमेढ रोवली गेली.

याच सहकाराच्या माध्यमातून तात्यासाहेब कोरे यांनी वारणा खोऱ्याच्या परिसरात अभूतपूर्व असा विकास सहकार चळवळीच्या माध्यमातून घडवून आणला.

**संशोधनाची उद्दिष्टे**

1.वारणा खोऱ्यातील सहकारी चळवळीतील तात्यासाहेब कोरे यांच्या योगदानाची माहिती करून घेणे.
2. वारणा खोऱ्यातील सहकारी चळवळीमुळे घडून आलेल्या समाज परिवर्तनाची माहिती घेणे.
3. वारणा खोऱ्यातील सहकार चळवळीच्या संदर्भात कार्यकर्त्यांच्या योगदानाची माहिती घेणे.
4. तात्यासाहेब कोरे यांच्या सहकारी चळवळी बरोबरच सामाजिक कार्याची माहिती जाणून घेणे.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत शोध निबंध दुय्यम स्रोत साधनांवर आधारित आहे. विविध संदर्भ ग्रंथ, पुस्तके, नियतकालिके, समाजविज्ञान कोश, वृत्तपत्रे इत्यादी साधनांचा वापर करण्यात आला आहे.

**तात्यासाहेब कोरे (१९१४ - १९९४) :-**

अण्णाप्पा व भागीरथी यांच्या पोटी काशीबाई, विश्वनाथ उर्फ तात्यासाहेब व दिनकर यांचा जन्म झाला. या घराण्यात सर्वात मोठी बहीण काशीबाई हिचा जन्म झाला. काशीबाई नंतर दि.१७ ऑक्टोंबर १९१४ रोजी विश्वनाथ उर्फ तात्यासाहेब कोरे यांचा जन्म झाला. तात्या साहेबांना आईचे दूध मिळाले हे त्यांचे भाग्यच. कारण १९१८ च्या आसपास कोल्हापुरात संस्थानात प्लेग, कॉलरा, मलेरिया ह्या रोगांनी भयंकर अच्छाद मांडला होता. यावेळी कोडोलीला प्लेगचा उपसर्ग पोहोचला व ह्या प्लेगने त्यांच्या आईचा (भागीरथीचा) बळी घेतला.[१]

'सन १९२१ साली तात्यासाहेब सात वर्षाचे असताना शाळेत घालण्यात आले ही शाळा म्हणजे कोडोलीतील प्राथमिक मराठी शाळा''[२] १९२७ कोडोलीच्या शाळेतून ते सहावी पास झाले त्यावेळी त्यांचे वय १२वर्षे होते. पुढे तात्यासाहेबांनी मॅट्रिक होण्याची स्वप्ने रंगविली होती परंतु त्यांना शिक्षण अर्धवट बंद करावे लागले. कारण त्यांच्या चुलत्यांचा कॅन्सरच्या रोगाने झालेला अचानक मृत्यू होय. त्यामुळे तात्यांना सांगलीची शाळा सोडून घरच्या कारभारात लक्ष घालण्यासाठी तात्काळ कोडोलीला यावे लागले. मॅट्रिक होता आले नाही. शिक्षण येथेच थांबले, त्यांना शाळेतील बाकावरून दुकानाच्या तराजूवर लक्ष घालावे लागले.

**तात्यासाहेब कोरे यांचे स्थानिक नेतृत्व :-**

या काळात आपल्या कुटुंबाचा व्यापार-उद्योग सावरत तसेच शेती पाहत कोडोली च्या सामाजिक, शैक्षणिक व राजकारण या क्षेत्रामध्ये त्यांनी भाग घेतला. त्यांनी आपल्या नकाराध्यक्ष पदाचा उपयोग ग्रामीण

सुधारण्यासाठी तर अस्पृश्य निवारणासाठी स्वतःच्या घरी व व्यवसायात अस्पृश्य व्यक्तींना कामावर ठेवले अस्पृश्य विद्यार्थ्यांना मदत केली. गावात सहभोजन असे अस्पृश्यता निवारणाचे काम केले. तसेच कर्ज काढून थाटात विवाह करण्यापेक्षा सुधारकी पद्धतीने किंवा गांधी पद्धतीच्या विवाहाचा प्रचार स्वतःच्या कुटुंबातील व मित्रांचे विवाह गांधी पद्धतीने करून समाजात आदर्श निर्माण केला. शिक्षणाशिवाय समतेवर आधारित समाज निर्माण होणार नाही. हा कर्मवीर अण्णाचा विचार घेऊन १९४६ मध्ये कोडोली मध्ये वस्तीगृहयुक्त विद्यालयाची स्थापना केली.

**वारणा खोऱ्याचे नेतृत्व :-**

डॉ. धनंजयराव गाडगीळ व श्री मा. विखे पाटील यांच्या प्रयत्नातून अहमदनगर जिल्ह्यात प्रवरानगर येथे १९४९ ला पहिला सहकारी साखर कारखाना सुरू झाला. महाराष्ट्र शासनाने पण १९५२ मध्ये महाराष्ट्रात बारा सहकारी साखर कारखाने उभे करण्याचा निर्णय घेतला त्यातील ४ कारखाने कोल्हापूर जिल्ह्यात उभे करायचे होते.

शासनाचा हा निर्णय तात्यासाहेबांना एक नवी संधी वाटली. त्यांनी स्वतःला साखर कारखान्यासाठी वाहून घेतले. कारखान्याचा प्रकल्प अहवाल २० ऑगस्ट १९५४ ला मंजूर तर ५ जानेवारी १९५५ ला नोंदणी झाली.[३] प्रवर्तक मंडळाच्या पहिल्या सभेतच तात्यासाहेबांची अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली. कारखान्याच्या पायाभरणीपासून प्रत्यक्ष कारखाना सुरू होईपर्यंत कार्यस्थळावर प्रत्यक्ष झोपडीत राहून कारखाना उभा करणारे तात्यासाहेब एकमेव सहकारमहर्षी आहेत.[४]

कारखान्याच्या पहिल्या बॉयलर अग्नीप्रदीपन समारंभ १६ फेब्रुवारी १९५९ ला सौ. सावित्रीबाई कोरे (तात्यांच्या पत्नी) यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.[५] आणि १ नोव्हेंबर १९५९ दिपावली पाडव्याच्या मुहूर्तावर श्री. यशवंतराव चव्हाण आणि सौ. वेणूताई चव्हाण यांनी कारखान्याच्या मोठ्या यंत्रसामग्रीची, ऊस टाकायच्या गव्हाणीची पूजा केली. शुभमुहूर्तावर यांच्या शुभहस्ते गव्हाणीत ऊस टाकले गेले. आणि तो श्री. वारणा सहकारी साखर कारखान्याचा शुभारंभ होय. तात्यासाहेबांच्या नेतृत्वाखाली आजपर्यंत अनेक वेळा कार्यक्षमतेची राष्ट्रीय पातळीवरची बक्षिसे या कारखान्याने मिळवली आहेत.

**शैक्षणिक चळवळ :-**

कारखान्याने समाजाची आर्थिक प्रगती होईल पण समाजाची शैक्षणिक प्रगती होणार नाही. समाजाची वैचारिक पातळी उंचवावी परिसरातील शेतकरी, कामगार गरिबांच्या मुलांना शिक्षण मिळावे म्हणून १९६४ मध्येच मंडळामार्फत श्री. वारणा महाविद्यालय सुरू केले. तसेच १९८३ मध्ये 'आय टी आय' ची सुरुवात केली.[६] तसेच ५ सप्टेंबर १९८३ ला शिक्षक दिनाच्या दिवशी मा. नामदार वसंतदादा पाटील यांच्या मंत्रिमंडळाने ग्रामीण भागातील तंत्रज्ञानाची असणारी उणीव भरून काढण्यासाठी विनाअनुदानित तत्त्वावर "तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्यूट ऑफ इंजीनियरिंग अँड टेक्नॉलॉजी" या खाजगी संस्थेला मान्यता दिली.[७] या संस्थेतून कारखाना परिसरातील सर्व होतकरू तरुणांना तंत्रज्ञानाची संधी मिळावी हीच प्रेरणा होती. शिक्षणाचा पाया खालून वर जात असतो. पण वारणानगरीत तो वरून खाली आला आहे. कारण प्रथम १९६४ मध्ये महाविद्यालय स्थापन झाले नंतर १९६९ साली पूर्व प्राथमिक तसेच १९६९ साली वारणा महाविद्यालयाची स्थापना झाली.

**आर्थिक प्रकल्प (बँक) :-**

खेड्यात जन्माला येऊन शहरात शाखा उघडण्याचा पराक्रम करणारी 'वारणा सहकारी बँक' आज संपूर्ण महाराष्ट्रात नावाजलेली आहे. त्या बँकेचे मुख्य कार्यालय वारणानगर येथे असून बँकेच्या शाखा कोल्हापूर, जयसिंगपूर,वडगाव इत्यादी शहरांमध्ये सुरू आहेत. २८ फेब्रुवारी १९६६ ला 'श्री वारणा सहकारी' बँक रजिस्टर झाली.[८] बँकेची घटना 'कृषी औद्योगिक' दृष्टिकोनातून तयार करण्यात आली नव्हती. पण पुढे तात्यासाहेबांनी कृषी व्यवस्थेला हातभार लागणाऱ्या योजना अंमलात आणल्या. वारणा बँक परिसरातील शेती, जोडधंदा, दुग्ध व्यवसाय, ट्रॅक्टर खरेदी, कुक्कुटपालन व्यवसाय इत्यादी. करिता कर्ज पुरवठा करीत असून ग्रामीण कारागीरांना सुद्धा त्यांच्या धंद्याच्या भरभराटीसाठी कर्ज पुरवठा करत आहे.

**दुग्ध प्रकल्प :-**

तात्यासाहेबांनी सर्वसामान्य माणसाच्या विकासाचे स्वप्न उराशी बाळगले होते. तात्यांनी वारणा परिसरात अनेक समाज उपयोगी कामे केली. पण त्यात सर्वात यशस्वी ठरलेला प्रकल्प म्हणजे 'वारणा दूध प्रकल्प' वारणा खोऱ्यातील विशेष करून जिरायती शेतकऱ्यांसाठी शेतीला किफायतशीर जोडधंदा म्हणून २०जुलै १६६८ मध्ये "श्री वारणा सहकारी दूध उत्पादक प्रक्रिया संघ लि." या नावाची सहकारी संस्था स्थापन करण्यात आली. १९७६ पासून दुधावरील प्रक्रियेस आणि दूध भुकटी आणि तुपाची निर्मिती यांना सुरुवात केली. १९८१ - ८२ या वर्षी वारणा दूध संघाने तूप, पावडर, श्रीखंड वगैरे दुग्ध पदार्थांची विक्री पुणे, मुंबई येथे खुल्या बाजारात सुरू करून एक अत्यंत महत्त्वाकांक्षी पाऊल टाकले. वारणा दूध प्रकल्पाच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे जे जीवनमान उंचावल्याचे स्वप्न साकार झाले त्या श्वेतक्रांती बद्दल वसंतराव नाईक कृषी संशोधन आणि ग्रामीण विकास प्रतिष्ठान तर्फे पंचवीस हजारांचे दुग्धविकास पारितोषिक व प्रमाणपत्र तात्या साहेबांना मिळाले.

**वारणा बाझार :-**

वारणा म्हणजे विकासाची गंगा हे असे समीकरण जुळले आहे त्याचप्रमाणे वारणा बाझार म्हणजे नवनवे विक्रम असे पण समीकरण जुळले आहे. वारणा बाझार हे आपल्या देशातील ग्रामीण भागातले पहिले सहकारी सकल वस्तू भंडारा असून त्याची स्थापना २ एप्रिल १९७८ ला झाली.[१०] वारणा बाझार ही अत्यंत विश्वासू ग्राहक संस्था आहे.

**वारणा कोंबडी सहकारी संघटना :-**

कारखाना क्षेत्रातील शेतकऱ्यांना शेतीसोबत एखादा किफायतशीर जोडधंदा असावा म्हणून तात्यांनी २७ डिसेंबर १९६३ ला श्री वारणा कोंबडी सहकारी संस्थेची स्थापना केली.[११] तसेच कारखान्याचे काही सभासद आणि कर्मचारी यांनी एकत्र येऊन १८ जुलै १९६८ ला सह्याद्री कुक्कुटपालन संस्था स्थापन केली. वारणेमध्ये हे दोन्ही पोल्ट्री संघ यशस्वी होत आहेत हे लक्षात येतात १९८८ मध्ये तात्यांनी विश्वनाथ कुक्कूट पालन सहकारी संस्था हा आणखी एक पोल्ट्री संघ स्थापन केला. या तिन्ही संस्थेद्वारे परिसरातील शेतकऱ्यांना कुक्कुटपालन व्यवसायाचे मार्गदर्शन, प्रशिक्षण दिले जाते.

**श्री वारणा विभाग सत्कार्य संवर्धक मंडळ :-**

वारणा साखर कारखान्याच्या सहकार्यातून आणि अनुदानातून चाललेली ही सेवाभावी संस्था १९६९ साली नोंदवली. [१२] या संस्थेमार्फत कारखाना परिसरातील खेड्यापाड्यात व गाववस्तीवर जिथे गरज आहे तिथे बाल शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिलेली आहे. तसेच जीवनात ग्रंथाचे महत्त्व ओळखून तात्यासाहेब कोरे आदर्श ग्रंथालय व आदर्श ग्रंथपाल पुरस्कार योजना राबवली जात आहे. दरवर्षी प्रथम येणाऱ्या ग्रंथालय व ग्रंथपालास रोख रक्कम व प्रशस्तीपत्र दिले जाते. तसेच समाज उपयोगी व्याख्यानमाला सुरू करून सर्वसामान्य लोकांना जागृत करण्याचे काम केले.

वारणा परिसरातील शेतकऱ्यांना फळबागाची शेती करण्यासाठी व त्यातून आपली प्रगती करण्यासाठी विविध फळांवर प्रक्रिया करून त्यापासून निर्मित उत्पादने परदेशात पाठवण्यासाठी 'वारणा ॲग्रीकल्चर गुड्स प्रोसेसिंग को-ऑपरेटिव्ह सोसायटी' स्थापना १९९८ रोजी वारणेचे नेते
विनय कोरे यांनी सुरू करून तात्यांना व विलास दादांना अभिप्रेत असलेले शेतकऱ्यांच्या विकासाचे स्वप्न साकार करून दाखवले.

**वारणा भगिनी मंडळ व महिला गृहोद्योग लिज्जत पापड केंद्र :-**

कारखाना कामगारांच्या महिलांना आणि नजीकच्या गावातील महिलांना घरबसल्या, फावल्या वेळेत काम करून द्रव्यार्जन करता यावे या उद्देशाने भगिनी मंडळामार्फत मुंबईच्या सुप्रसिद्ध महिला गृहोद्योग पापड केंद्राची शाखा वारणानगर येथे २५ सप्टेंबर १९७४ ला सुरू करण्यास आली.[१३] या लिज्जत पापडांनी वारणेच्या महिलांना गृहोद्योगाच्या कार्यात स्वावलंबनाची रुची आणि लिज्जत आणली. मुंबईच्या महिला गृहोद्योग संस्थेची ही तेरावी शाखा आणि महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील पहिलेच केंद्र होते.[14] या पापड केंद्रामुळे वारणा महिलांच्या जीवनात

सहकारी तत्त्वावरील एक गृहोद्योगाचा प्रारंभ झाला. 'लिज्जत' पापड केंद्र वाराणानगर येथे सुरू करण्यासाठी मुंबईचे श्री. 'सुमितभाई शहा आणि श्री. दत्तानीभाई' यांचे मोठे साहाय्य लाभले.[१५]

**सारांश :-**

वारणा खोऱ्यातील सहकार चळवळीने सर्वसामान्य माणसाच्या जीवनात प्रगतीची आशा प्रफुल्लित केली. ही प्रगतीची अशा प्रफुलित करणारे ग्रामीण नेतृत्व म्हणून तात्यासाहेब कोरे यांचा उल्लेख केला जातो. त्यांनी अनेक अडचणींना तोंड देऊन प्रथम कारखाना, शिक्षण संस्था, कोंबडी पालन, बँक, दूध संघ, बाझार असे अनेक उद्योग - व्यवसाय उभे करून ग्रामीण भागाचा कायापालट केला आहे. याचा फायदा २१ व्या शतकात भेडसवणारे प्रश्न सोडवण्यासाठी निश्चित मदत होईल. तात्यांच्या नेतृत्वाखाली वारणा विविध उद्योग व शिक्षण समूह ज्या पद्धतीने उभे राहिले त्यांचा आदर्श घेऊन इतरत्र असे कार्य करण्यास चालना मिळू शकते. भारताच्या सर्वांगीण विकासासाठी तात्यासाहेबांसारखे नेतृत्व निर्माण होणे आवश्यक आहे.

**संदर्भ :-**

1.मी एक कार्यकर्ता -वि. आ. तथा तात्यासाहेब कोरे पृष्ठ्युब्दिपूर्ती समारंभ समिती प्रकाशन १ डिसेंबर १९७४ पृष्ठ क्र. १५

2.उपरोक्त पृष्ठ क्र. २१

3.उपरोक्त पृष्ठ क्र. १३८

4.उपरोक्त पृष्ठ क्र.१६६

5. उपरोक्त पृष्ठ क्र. १६८

6.वार्षिक अहवाल श्री. वारणा विभाग शिक्षण मंडळ सन १९८८ -८९, पृष्ठ ७

7.वार्षिक अहवाल श्री. वारणा विभाग शिक्षण मंडळ सन १९८८ -८९, पृष्ठ ८

8.बापूसाहेब पाटील, अध्यक्षीय मनोगत, श्री वारणा सहकारी बँक लि. वारणानगर रोप्यमहोत्सवी स्मरणिका १९९०-९१ , पृष्ठ क्र. १

9.नानासाहेब कोरे, धवलक्रांती, स्मरणिका श्री. वारणा सहकारी दूध उत्पादक संघ लि. अमृतनगर सन १९९२ -९३ पृष्ठ क्र.२८

10. वार्षिक अहवाल, वारणा बाजार, सन१९७७ – ७८ पृष्ठ क्र.२

11. मी एक कार्यकर्ता – वि. आ. तथा तात्यासाहेब कोरे पृष्ठ्युब्दिपूर्ती समारंभ समिती प्रकाशन,
१ डिसेंबर १९७४ पृष्ठ २४१

12. उपरोक्त पृष्ठ -१९१

13. उपरोक्त पृष्ठ -२३४

14. उपरोक्त पृष्ठ -२३४

15. उपरोक्त पृष्ठ -२३५